जा.क्र.पोआ/कक्ष—१०(हॉ.शा.)/______/१४.
कक्ष—१० (हॉटेल शाखा),
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
यांचे कार्यालय,

दिनांक :— /०८/२०१४.

प्रति,

**मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),**
पोलीस आयुक्तांचे कार्यालय,
बृहन्मुंबई.

**विषय :—** विशेष पोलीस परिपत्रक परिच्छेद क्र. ७१/२०१४, दि. ३०/०७/**२०१४**

सोबत जोडलेले महाराष्ट्र शासनाचे दि.२४ मे, २००१ व दि. ०३ डिसेंबर २०११ रोजीचे हॉटेल आस्थापनांच्या वेळेबाबतचे शासन निर्णय मुंबई पोलीस वेबसाईटवर सर्वांच्या माहितीकरीता प्रसिध्द् करण्याची विनंती आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
कक्ष—१० (हॉटेल शाखा),
पोलीस आयुक्तांचे कार्यालय,

# <u>विशेष पोलीस परिपत्रक परिच्छेद क्र. ७१/२०१४, दि.३०/०७/२०१४</u>

**कक्ष–१० (हॉटेल शाखा)**

दि. २८/०७/२०१४ रोजी हॉटेल अॅन्ड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया) या संघटनेचे पदाधिकारी यांनी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांची भेट घेऊन खालील तक्रारी मांडल्या.

१) आस्थापनांना रात्री ०१.३० वाजेपर्यंत मद्यविक्री करण्याची परवानगी दिलेली असतांनासुध्द्‍ा काही पोलीस ठाणेचे अधिकारी रात्री १२.३० वाजेनंतर मद्यविक्री केली म्हणून आस्थापनाधारकावर कारवाई करतात.

याबाबत स्पष्टीकरण करण्यात येते की, शासन आदेशाप्रमाणे मुंबई शहरामध्ये रात्रौ ०१.३० वाजेपर्यंत आस्थापनांमध्ये मद्यविक्री करण्यास हरकत नाही याबाबत महाराष्ट्र शासनाने दि.०५ जून, १९९९ व दि. ०३ डिसेंबर २०११ रोजी जारी केलेले शासन निर्णय पुन्हा एकदा सर्वांच्या माहीती करीता **<u>या पत्रकासोबत</u>** प्रसिध्द् करण्यात येत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सर्व अधिकारी व अंमलदार यांना याबाबत माहीती द्यावी. (सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर क्र. 20040428134153001 व क्र. 20111203060008001 प्रमाणे उपलब्ध आहेत.)

२) स्थानिक पोलीस रेस्टॉरंट प्रमाणेच लॉजींगसुध्दा रात्रौ ०१.३० वाजता बंद करण्यास सांगतात अन्यथा कारवाई करतात.

यासंदर्भात सुचित करण्यात येते की, सार्वजनिक जागेत करमणूक ठिकाण नियम १९५३ मधील नियम ७ प्रमाणे रात्रौ ०१.३० वाजता हॉटेल आस्थापना व आस्थापनेमधील मद्यविक्री बंद करणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र. १९, १९–अ व २९ हे लॉजींग बाबत असून त्यामध्ये वेळेचे बंधन घालण्यात आलेले नाही. मुंबई शहरामध्ये रोजगार/औषधोपचाराकरिता तसेच कामानिमित्त येणारे स्थानिक अथवा विदेशी नागरीक हे कोणत्याही वेळी येऊ शकतात व त्यामुळे लॉजींग व्यवसाय रात्रौ ०१.३० नंतर बंद ठेवणे योग्य होणार नाही.

याबाबत पोलीस आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत की, लॉजींग व्यवसाय करीत असलेल्या ज्या आस्थापनाधारकांच्या परवान्यावर रात्रौ ०१.३० वाजेपर्यंतची मर्यादा नोंद करण्यात आली आहे, अशी नोंद संबधित विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी सदर परवान्यावरून काढून टाकावी.

**हॉटेल आस्थापनांच्या वेळा विनियमित करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
गृह विभाग (विशेष)
शासन परिपत्रक क्र. —आरईएच २०११/१०६/विशा—५,
मंत्रालय, मुंबई.—४०० ०३२, दि. —०३ डिसेंबर, २०११.

वाचा:— १) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१८९/विशा—५, गृह विभाग (विशेष), दि. १० मार्च, १९८९.
२) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१९६/१५०/विशा—५, गृह विभाग (विशेष), दि. ०९ ऑक्टोबर, १९९७.
३) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१९९/८५/विशा—५, गृह विभाग (विशेष), दि. ०५ जून, १९९९.
४) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१९९/१२४/विशा—५, गृह विभाग (विशेष), दि. ०९ सप्टेंबर, १९९९.
५) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१९९/८५/विशा—५, गृह विभाग (विशेष), दि. २४ मे, २००१.

**परिपत्रक**

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये राज्यात हॉटेल आस्थापनांमध्ये खाद्यपदार्थ व मद्य पुरविण्याच्या वेळांबाबत तसेच हॉटेल आस्थापना बंद करण्याच्या वेळांबाबतची मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत. संपूर्ण राज्यात विहीत करण्यात आलेल्या हॉटेल आस्थापनांच्या वेळांबाबत एकसुत्रता नसल्याने निर्माण होणारा संभ्रम दुर करण्याच्या दृष्टीने हॉटेल आस्थापनांच्या वेळेत एकसुत्रता आणण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. अनुषंगाने अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने निंमत्रीत केलेल्या बैठकीत सर्व संबंधीत विभागांच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेअंती केलेल्या शिफारशीनुसार आता संपूर्ण राज्यात हॉटेल आस्थापनांच्या संदर्भात खालीलप्रमाणे वेळा निश्चित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) मुंबई, नवी मुंबई व ठाणे आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील हॉटेल आस्थापनांमध्ये रात्री ०१.३० वाजेपर्यंत खाद्यपदार्थ व मद्य पुरविण्यास हरकत नसावी. मात्र सदर आस्थापना ०१.३० वाजता बंद करण्यात यावी.

२) पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील आस्थापनांच्या संदर्भात रात्री ११.३० वाजेपर्यंत खाद्यपदार्थ व मद्य पुरविण्यास हरकत नसावी आणि हॉटेल आस्थापना रात्री १२.३० वाजता बंद करण्यात यावी.

३) उर्वरित महाराष्ट्राकरीता हॉटेल आस्थापनामध्ये रात्री १०.०० वाजेपर्यंत खाद्यपदार्थ व मद्य पुरविण्यास हरकत नसावी आणि आस्थापना रात्री ११.३० वाजता बंद करण्यात यावी.

४) शासन परिपत्रक गृह विभाग क्र. आरईएच ०१९७/१५०/विशा—५, दि. ०९.१०.१९९७. अन्वये चार तारांकीत व त्यावरील तारांकीत असणाऱ्या ज्या आस्थापनांमध्ये डिस्कोथेक क्लबना

परवानगी देण्यात आली आहे अशा आस्थापनांना सदर परिपत्रकात नमूद अटींच्या अनुषंगाने रात्री ०३.०० वाजेपर्यंत आस्थापना उघडी ठेवण्यास परवानगी देण्यात यावी.

हे आदेश उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून हे आदेश तत्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(श.बा. पावसकर),
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
गृह विभाग (विशेष), मंत्रालय.

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) प्रधान सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई—३२.
३) प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई—३२.
४) प्रधान सचिव, (कामगार) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मुंबई—३२.
५) सर्व जिल्हादंडाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
६) सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
७) कामगार आयुक्त, मुंबई.

**हॉटेल/रेस्टॉरंट/खाद्यपेय गृहे/टी स्टॉल/**
**ज्युस सेंटर इत्यादींच्या वेळा**
**नियमित करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
गृह विभाग (विशेष)
परिपत्रक क्र. —आरईएच ०१९९/८५/विशा.५,
मंत्रालय, मुंबई.—४०० ०३२, दि. —२४ मे, २००१.

संदर्भ:— शासन परिपत्रक, गृह विभाग (विशेष) क्र.आरईएच—०१९९/८५/विशा—५, दि. ०५ जून, १९९९.

## परिपत्रक

शासन परिपत्रक, क्र. आरईएच ०१९९/८५/विशा.५, दि. ०५ जून, १९९९. अन्वये बृहन्मुंबई, नवी मुंबई व ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील हॉटेल आस्थापनांमध्ये खाद्यपेय व मद्य पुरविण्यासाठी रात्रौ १२.३० वा. पर्यंत आणि तद्नंतर खाद्यपेय व मद्य संपविण्यासाठी त्याचप्रमाणे हॉटेल आस्थापना आवराआवरीसाठी रात्रौ ०१.३० वा. पर्यंत वेळ देण्यात आली होती. खाद्यपेय व मद्य पुरविण्यासाठीची वेळा विहीत करण्यात आल्यामुळे काही ग्राहक हे त्यांना रात्रौ १२.३० वा. पुर्वी खाद्यपेय व मद्य पुरविले असले तरी ते संपविण्याकरीता त्यांना रात्रौ ०१.३० वाजेपर्यंत वेळ लागतो. तथापी, यामुळे हे खाद्यपेय व मद्य रात्रौ १२.३० वा. नंतर पुरविण्यात आले असे समजून काही वेळेस हॉटेल आस्थापनांविरूध्द् कारवाई केली जाते व विणाकारण तणाव निर्माण होतो अशी हॉटेल संघटनांची वस्तूस्थिती शासनासमोर मांडली. हॉटेल आस्थापना बंद करण्याच्या वेळेबाबत जो संभ्रम निर्माण होतो तो दुर करण्याकरीता शासनाने या बाबतींच्या आदेशात सुस्पष्टता आणण्याचा निर्णय घेणे अपरिहार्य झाले होते.

उक्त पार्श्वभुमीवर शासनाने असा निर्णय घेतला आहे की, हॉटेल आस्थापना पूर्वीप्रमाणेच मुंबई, नवी मुंबई व ठाणे पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रातील रात्रौ १.३० वाजता बंद होतील. तथापी या क्षेत्रात संदर्भाधिन परिपत्रकान्वये खाद्यपेय व मद्य पुरविण्याची रात्रौ १२.३० वा. पर्यंत घातलेले बंधन रद्द करण्यात येत आहे. त्यानुसार खाद्यपेय व मद्य पुरविणे आणि नृत्य/मनोरंजन हे रात्रौ १.३० वा. पर्यंत चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. संदर्भाधिन परीपत्रकातील इतर अटी पुर्वीप्रमाणेच राहतील.

हॉटेल आस्थापनांना मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ व मुंबई दारूबंदी अधिनियम १९४८ च्या तरतूदीनुसार परवाने घ्यावे लागत असल्याने वर उल्लेखिलेले अधिनियम ज्या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत त्या विभागाने तसेच त्या त्या अधिकाऱ्याने त्या नियमात वर दर्शविल्याप्रमाणे सुधारणा कराव्यात असेही या परीपत्रकाद्वारे त्यांना सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वि.तू.प्रभू)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग (विशेष), महाराष्ट्र शासन.